भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ५१०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०७/२०१७

**१) घरात प्रवेश करुन महिलेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले घरी एकटी हजर असतांना यातील आरोपीतांनी सायकल, पैश्याचे आमिष दाखवुन घरात प्रवेश करुन आरोपी यांनी दरवाजा आतुन बंद करुन तिचे तोंड दाबुन तिला जमीनीवर पाडले व तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला फिर्यादी ही अनुसुचित जातीची असल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,३४८,४५२ भांदवि. सहकलम ३(१)(२),३(२)व्ही(ए)अ.जा.ज.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सा. भंडारा-श्री. जोगदंड हे करीत आहेत.

**२) ग्राहकांची व भारतीय जिवन विमा निगमची फसवणुक करुन रकमेची अफरातफर करुन बॅकेचा विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/११/२०१६ ते २०/०५/२०१७ चे. दर. यातील आरोपी हा बॅकेत ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस असतांना बुध्दी पुरस्पर व लुबाडण्याचे उद्देशाने संगनमताने सहयाचे चेक च्या खोटया नोंदी घेवुन खरे चेक बदलवुन त्या ऐवजी स्वत:चे नावाने चेक बनवुन ४८,५१९९८/–रु. रक्कमेची अफरातफर करुन ग्राहकांची भारतीय जिवन विमा निगमची फसवणुक करुन बॅकेचा विश्वासघात केल्याने फिर्यादी मंगेश अनिल एलकुंचवार वय ३२ वर्ष, रा. ह. मु. नक्षत्रा अपार्टमेन्ट फ्लॅट नं. २०२ दसरा मैदान जवळ भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४०८,४०९,४२०,४७७(अ) भादंवि. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. कंकाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) जादुटोनाच्या करण्याच्या उद्येशाने साहित्यानिशी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०७/२०१७ चे २१.३० वा. दर. यातील आरोपी हे पुजेचे साहित्य व कोंबडे घेवुन पुजा पाठ करुन जादुटोना करण्याकरीता रात्रीच्या वेळी एकत्र येवुन जादुटोना करण्याचे उद्येशाने उके यांच्या मुलाचा आजार बरा व्हावा म्हणुन घटनास्थळी जादुटोनाच्या साहित्यानिशी फिर्यादी पुरुषोत्तम मोतीराम शिवनकर वय ४८ वर्ष, रा. बेलाटी यांना मिळुन आल्याने त्यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३(२) महा.न. नरबळी अमानुष अनिष्ठ व अगोरी प्रथा जादु टोना यांना प्रतिबंधक घालने व बाबत व त्याचे उच्चारण करणे बाबत अधि. २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. ताजने पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) ट्रॅक्टर हयगयीने चालवुन मोटार सायकला धडक देवुन दोन ईसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०७/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी ज्ञानेश्वर महागु नेवारे वय ५५ वर्ष, रा. चांदोरी हा त्याचे स्वत:चे टिव्हीएस व्हीक्टर मोटार सायकलने भोजराम रंहागडाले व विठ्ठल वाढीवे यांचेसह चांदोरी कडुन सोनेगाव कडे जात असता सोनेगाव कडुन चांदोरी कडे येणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर वेगाने, हयगयीने चालवुन फिर्यादीस मोटार सायकल ला चांदोरी ते सोनेगाव डांबरी रोड येथे धडक मारुन मोटार सायकल चालकासह मागे बसलेले दोघेही ईसम खाली पडल्याने त्यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास सफौ. गोडंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०७/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादीस आरोपीने 'तु माझ्या सासुला कशाला मारण्यास धावलास' असे आरोपीस विचारले असता या कारणावरुन आरोपीने सार्वजनिक ठिकाणी सिमेंट रोडवर फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीस व तिचे परिवारास मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. लेंडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक १३/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे पालांदुर, अडयाळ व मोहाडी येथे अवैध दारु /जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १ लिटर ७१० मिली लिटर देशी /विदेशी दारु किमती. ८५०/—रु. चा माल तसेच जुगारातुन किंमती १८५/—रु. जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.